दैनिक महा मेट्रो

www.mahametronews.in

वर्ष ४ थे : अंक : ९ पुणे, बुधवार, २७ ऑगस्ट २०२५

RNI NO.MAHMAR2022/87390

पाने : ४ किंमत : ३.००

VOL NO.04. ISSUE : 9 Pune, Wednesday, 25 August 2025

Pages : 4 PRICE : 3.00



# मानाच्या मंडळांत प्राणप्रतिष्ठा सोहळ्यांची लगबग

**आजपासून पासून गणेशोत्सवाला सुरुवात होत असून पुण्याचा गणेशोत्सव देशविदेशात प्रसिद्ध आहे. दरवर्षी लाखो भाविक पुण्यातील मानाचे गणपती तसेच प्रमुख मंडळांचे गणेशोत्सव पाहण्यासाठी मोठ्या संख्येने हजेरी लावतात. यंदाही मानाच्या गणपती मंडळांच्या प्राणप्रतिष्ठापना मिरवणुका आणि मुहूर्तांच्या वेळा निश्चित झाल्या आहेत.**

मानाचा पहिला श्री कसबा गणपती मंडळाची मिरवणूक मूर्तिकार अभिजीत धोंडफळे यांच्या घरून सकाळी दहा वाजता निघणार आहे. चांदीच्या पालखीतून श्रींची मूर्ती विराजमान होईल. मिरवणुकीत विविध ढोल ताशा पथकांचा सहभाग असेल. प्राणप्रतिष्ठापना सकाळी ११ वाजून ३७ मिनिटांनी सवितानंद महाराज यांच्या हस्ते होणार आहे.

मानाचा दुसरा श्री तांबडी जोगेश्वरी गणपती मंडळाची मिरवणूक सकाळी १० वाजता नारायण पेठ येथून सुरू होईल. १३३वे वर्ष साजरे करणाऱ्या या मंडळाच्या मिरवणुकीत ब्रास बँड आणि ढोल ताशा पथके सहभागी होणार आहेत. दुपारी १२ वाजून ११ मिनिटांनी योगेश्वी शरदाशास्त्री जोशी यांच्या हस्ते प्राणप्रतिष्ठापना होईल.

मानाचा तिसरा श्री गुरुजी तालीम गणपती मंडळाची मिरवणूक सकाळी ११ वाजता मंदिरातून निघणार आहे. आकर्षक फुलांच्या रथातून श्रींचे आगमन होईल. नगरवादन आणि ढोल ताशा पथकांचा गजर या मिरवणुकीत होणार आहे. दुपारी २ वाजून ३५ मिनिटांनी उद्योजक पुनित बालन यांच्या हस्ते प्राणप्रतिष्ठापना पार पडेल.

मानाचा चौथा श्री तुळशीबाग गणपती मंडळ यंदा शतकोत्तर रौप्यमहोत्सवी वर्ष साजरे करत आहे. सकाळी १० वाजता गणपती चौकातून मिरवणूक निघेल तर प्राणप्रतिष्ठापना दुपारी १२ वाजून १५ मिनिटांनी निरंजन नाथ महाराज यांच्या हस्ते होईल.

मानाचा पाचवा केसरी वाडा गणपती मंडळाची मिरवणूक सकाळी नऊ वाजता रमणबाग चौकातून होणार आहे. परंपरेनुसार मानाच्या पालखीतून आगमन होईल. सकाळी १० वाजता रौनक रोहित टिळक यांच्या हस्ते श्रींची प्राणप्रतिष्ठापना केली जाईल.

पान ३ वर...

## महत्वाचे...

### नोकरीच्या आमिषाने १७ लाखांची फसवणूक

**पुणे । प्रतिनिधी**

हिंजवडी परिसरात बनावट कंपनी उभारून तरुणांना मोठ्या पगाराची नोकरी देण्याचे आमिष दाखवून तब्बल १७ लाख १६ हजार ५०० रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी हिंजवडी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, फ्लायनट सास प्रा. लि. या नावाने हिंजवडी फेज २ येथील इम्पेरीअर राईज सोसायटीमध्ये कार्यालय सुरू करून आरोपींनी अनेक तरुणांना नोकरीचे आमिष दाखवले. मोठा वार्षिक पगार मिळेल असे सांगून तरुणांकडून १ लाख ते २.५ लाख रुपये कंपनीच्या बँक खात्यात जमा करून घेण्यात आले. यानंतर मेलद्वारे नियुक्तीपत्र, ऑफर लेटर, पॅकेजविषयी माहिती देण्यात आली. तसेच गुगल मिटवर ऑनलाइन प्रशिक्षणही घेण्यात आले. सुरुवातीला काहींना थोडाफार पगार देऊन विश्वास बसवला; पण त्यानंतर ७-८ महिने काम करून घेतले तरी पगार न देता "परिक्षेत नापास" किंवा "इंटरव्ह्यू अपयशी" अशी कारणे देऊन सर्वांना थेट फसवण्यात आले. या प्रकारात अनेक मुलांकडून मिळून तब्बल १७.१६ लाख रुपयांचा अपहार झाल्याचे स्पष्ट झाले आहे. आरोपी उपेश पाटीलला अटक करण्यात आली आहे.

### निघोजे गावात गुटख्याचा साठा जप्त

**चिंचवड । प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महाळुंगे एमआयडीसी पोलिसांनी निघोजे मोई रोडवरील एका भाड्याच्या खोलीवर धाड टाकून गुटख्याचा मोठा साठा हाती घेतला. शनिवारी (२३ ऑगस्ट) रात्री ७ वाजता ही कारवाई करण्यात आली. राजस्थानमधील मूळचा टोयाराम बोराराम चौधरी नावाचा व्यक्ती निघोजेत राहत असून, त्याच्या खोलीत तब्बल १५,४०० रुपयांचा १५४ पाकिटांचा गुटखा साठवून ठेवलेला आढळला. हा गुटखा विक्रीसाठी ठेवण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणात महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### पिस्तूलसकट युवक पोलिसांच्या जाळ्यात

**पुणे । प्रतिनिधी**

बावधन – ओंकार गार्डन ब्रिज ते चांदणी चौक रस्त्यावर शुक्रवारी रात्री नऊच्या सुमारास पोलिसांना धक्कादायक माहिती मिळाली. एम-कनेक्ट बिल्डिंग शेजारी एक तरुण देशी बनावटीचे पिस्तूल आणि जिवंत राऊंडसकट थांबलेला आढळला. राहुल उर्फ सोन्या प्रकाश ढगे (वय २५, रा. पारखे वस्ती, सुसगाव, ता. मुळशी) असे त्या तरुणाचे नाव असून पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले आहे. त्याच्याकडून ५० हजार रुपये किमतीचे पिस्तूल आणि १ हजार रुपये किमतीचे एक जिवंत राऊंड जप्त करण्यात आले. या परिसरात आधीच पोलीस आयुक्तांनी शस्त्रबंदी आदेश जारी केला होता. तरीही ढगे हा पिस्तूलसकट फिरताना सापडल्याने त्याच्यावर कारवाई करण्यात आली.

# 'डेक्कन'ला न मिळालेल्या टीडीआरची विक्री थांबविली

## ५३ कोटी रुपये किंमतीच्या जागेची पाच कोटी रूपयांत केली होती विक्री

**पुणे । प्रतिनिधी**

डेक्कन कॉलजेच्या तत्कालीन कुलगुरू आणि रजिस्टार यांनी चक्क पुणे महापालिकेकडून न मिळालेल्या २२ हजार ७१० चौरस मिटर टीडीआर ( विकास हस्तांतरण हक्क) परस्पर एका बांधकाम व्यवसायिकाला विकले होते . या टीडीआर चे बाजारमूल्य ५३ कोटी रूपये असताना त्याची कवडीमोल किंमतीत अर्थात पाच कोटी रुपयांनी विक्रीकेली होती. विशेष म्हणजे सहधर्मदाय आयुक्त रजनी क्षीरसागर व डेक्कन कॉलेजच्या विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष तथा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू सुरेश गोसावी यांना या बाबत पूर्णता अंधारात ठेवले होते. मात्र डेक्कन कॉलेजच्या विश्वस्तांनी या विक्रीला स्थगिती दिली आहे.



डेक्कन कॉलेजचे तत्कालीन कुलगुरू प्रमोदकुमार पांडे व रजिस्टार अनिता सोनवणे यांनी थंड डोक्याने पुणे महापालिकेकडून अद्याप न मिळालेल्या २२ हजार ७१० चौरस मिटर टीडीआर चक्क पाच कोटी रूपयांत विक्री केली होती . ज्याची किंमत आज बाजारमुल्याप्रमाणे तब्बल ५३ कोटी रूपये आहे. त्यामुळे या गैरव्यवहारात काही तरी काळेबेरे असल्याची दाट शक्यता होतो. दरम्यान टीडीआर विक्री केल्याच्या चार महिन्यानंतर विद्यमान कुलगुरू प्रसाद जोशी यांनी जसे काहीच झाले नसल्याचा आव आणला होता. धर्मादाय सहआयुक्त रजनी क्षीरसागर यांच्या कार्यालया मार्फत डेक्कनकॉलेज प्रशासनाला टीडीआर संबंधित तक्रारी येऊ नये म्हणून वृत्तपत्रात जाहिर नोटीस देण्यास भाग पाडले. टीडीआर विक्री झाल्याचे त्यांनी सहधर्मादाय आयुक्त कार्यालयाला कळविले नाही. तर २८ जानेवारीचा २०२५ रोजी विश्वस्त बैठकित विश्वस्तांसह डेक्कन कॉलेजचे विश्वस्त अध्यक्ष तथा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू सुरेश गोसावी यांना सुद्धा टीडीआरची विक्री झाल्याचे सांगितले नाही. याचा अर्थ त्यांचा या गैरव्यवहारात अप्रत्यक्ष सहभाग असल्याचे उघड असल्याची चर्चा होती.


### टीडीआर घोटाळ्यात मोठे बांधकाम व्यावसायिक

**डेक्कन कॉलेजच्या टीडीआर घोटाळ्यात एक मोठे बांधकाम व्यवसायिक असल्याची चर्चा आहे. पुष्पा प्रॉपर्टीज ही बोगस कंपनी दाखवून टीडीआर लाटणारे भलतेच असल्याची चर्चा पुणे महापालिका वर्तुळात आहे. त्यामुळे टीडीआर घोटाळा करणारे, त्याची विक्री करणारे ते खरेदी करणारे , त्यांना मदत करणा-यांचे एक मोठे रॅकेट असल्याचाही चर्चा आहे.**

### टीडीआर ची पाश्वभुमी

राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेच्या वेळी पुणे महानगरपालिकेने रस्ता रुंदीकरणासाठी डेक्कन कॉलेजची २२ हजार ७१० चौरस मिटर जागा घेतली होती. त्या बदल्यात महापालिकेने डेक्कन कॉलेजला

पान ३ वर...



# एअर इंडियाच्या पुणे-दिल्ली विमानात खिडकीचे पॅनल सैल

## प्रवाशांमध्ये भीती, देखभाल सुरक्षेवर प्रश्नचिन्ह

**पुणे । प्रतिनिधी**

शनिवारी रात्री पुणे ते दिल्ली या एअर इंडियाच्या AI-८७४ विमानातील प्रवाशांनी थरारक अनुभव घेतला. टेकऑफपूर्वीच सीट क्रमांक १०अ जवळील आतील खिडकीचे पॅनल हलताना दिसले, ज्यामुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

रात्री ८.३० वाजता निघणाऱ्या या विमानात प्रवासी दीपक त्यागी यांनी पॅनल हललेले पाहताच तातडीने केबिन क्रूला माहिती दिली. मात्र, त्यांच्या म्हणण्यानुसार क्रूने गंभीरतेने न घेता नेहमीप्रमाणे उड्डाण सुरू ठेवले. त्यागी यांनी याबाबत केलेली सोशल मीडियावरील पोस्ट मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाली आहे. त्यागी यांचा आरोप आहे की, इंजिनिअरला बोलावून तपासणी करण्यात आली नाही आणि प्रवास जसाच्या तसा सुरू ठेवण्यात आला. परिणामी, अनेक प्रवासी अस्वस्थ झाले व प्रवासादरम्यान तणावाखाली राहिले. एअर इंडियाने घटनेची दखल घेत प्रवाशांची सुरक्षा ही सर्वोच्च प्राथमिकता असून, चौकशी सुरू आहे, असे स्पष्ट केले. विमान वाहतूक तज्ज्ञांच्या मते, आतील पॅनल सैल

पान ३ वर...

# हिंजवडी तील रस्त्यांची झाली दुरवस्था; गणेशोत्सवानंतर आंदोलनाचा राष्ट्रवादीचा इशारा

**पुणे । प्रतिनिधी**

हिंजवडी आयटी पार्क परिसरातील रस्त्यांची दुरवस्था, खड्डे आणि राडारोडा यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अलीकडेच झालेल्या अपघातात ११ वर्षीय प्रत्युषा बोराटे या मुलीचा सिमेंट मिक्सरच्या धडकेत मृत्यू झाल्याने संतापाची लाट उसळली आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी सोमवारी इशारा दिला की, हिंजवडी खड्डेमुक्त व सुरक्षित न झाल्यास गणेशोत्सवानंतर आंदोलन छेडले जाईल.



१२ ऑगस्ट रोजी झालेल्या या अपघातानंतर मिक्सर चालक आणि मालकाला पोलिसांनी अटक केली. त्यानंतर सुप्रिया सुळे यांनी मृतक बोराटे कुटुंबीयांची भेट घेतली. त्यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधत सांगितले की, "हिंजवडी परिसरात अवजड वाहनांवर वेळेचे बंधन घालण्यात आले असले तरी प्रत्यक्षात त्याचे पालन होत नाही. यामुळे गंभीर अपघात घडत आहेत. मुख्यमंत्री

पान ३ वर...

# सीमांकनामुळे राष्ट्रीय एकतेला धोका : माजी आयएएस

**पुणे । प्रतिनिधी**

उत्तर आणि दक्षिण भारतातील वाढती आर्थिक, सामाजिक व राजकीय दरी देशासाठी गंभीर आव्हान ठरते आहे. प्रस्तावित मतदारसंघ सीमांकनाने ही दरी आणखी वाढेल आणि त्यामुळे राष्ट्रीय एकतेलाच धोका निर्माण होऊ शकतो, असा इशारा माजी आयएएस अधिकारी व माजी कोळसा सचिव अनिल स्वरूप यांनी दिला.

२३ ऑगस्ट रोजी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी (एमआयटी-डब्ल्यूपीयू) येथे आयोजित 'चौथ्या स्वर्गीय बी.जी. देशमुख स्मृती व्याख्यान २०२५' मध्ये ते बोलत होते.



रेषा पुन्हा काढणे, राजकारणाला आकार देणे: सीमांकन आणि उत्तर-दक्षिण संवेदनशीलता या विषयावर आयोजित या व्याख्यानात स्वरूप यांनी राजकीय सीमांकन आणि मनाचे सीमांकन या दोन स्तरांवर आपले विचार मांडले.

ते म्हणाले की, दक्षिणेकडील राज्ये ८ ते १० टक्के वेगाने प्रगती करत आहेत, तर उत्तर प्रदेश व बिहारसारख्या राज्यांत वाढ केवळ ४ ते ६ टक्क्यांपर्यंत मर्यादित आहे. लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवणाऱ्या राज्यांना शिक्षा आणि ज्यांनी तसे केले नाही त्यांना बक्षीस – हीच सीमांकनाची प्रक्रिया ठरणार असेल, तर देशात तणाव निर्माण होणारच, असा स्पष्ट इशाराही त्यांनी दिला.

स्वरूप यांनी सामाजिक निर्देशकांकडेही लक्ष वेधले – दक्षिणेत बालमृत्यू व माता मृत्युदर कमी असून साक्षरतेचे प्रमाण जास्त आहे, तर उत्तरेत परिस्थिती उलट आहे. तरीही सीमांकनाद्वारे उत्तरेकडे जास्त राजकीय अधिकार ढकलले जात असल्याने गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत, असे त्यांनी नमूद केले. राजकीय विश्लेषणापलीकडे जात त्यांनी मनाचे सीमांकन मोडून काढण्याचे आवाहन केले. परिस्थितीला दोष न देता स्वतःच्या सुधारणांवर लक्ष केंद्रित करा. प्रामाणिकपणा आवश्यक आहे, पण कार्यक्षमतेची जोड नसल्यास तो अपूर्ण राहतो. खरे नेतृत्व म्हणजे स्पष्टता, स्वीकार आणि परिणामकारक संवाद, असे ते म्हणाले. राष्ट्रीय एकतेवर गडद होत चाललेले हे सावट लक्षात घेऊन सीमांकनाच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करणे धोकादायक ठरू शकते, असा ठाम इशारा अनिल स्वरूप यांनी पुण्यात दिला.

# पुणे महापालिकेच्या हद्दीत तीन लाख भटकी कुत्री

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे महापालिकेच्या २०२४ - २०२५ च्या अर्थसंकल्पात रेबीज मुक्त पुणे करण्यासाठी विशेष तरतूद करण्यात आली होती. या मोहिमेअंतर्गत कुत्र्यांचे लसीकरण व नसबंदी करण्यात आली. रस्त्यावरील भटक्या व मोकाट कुत्र्यांवर, मांजरींवर उपचारासाठी यंत्रणा सज्ज करण्यात आली. यासह नवीन ३४ समाविष्ट गावातील भटक्या कुत्र्यांची गणना करण्यात आली. त्यामुळे पुणे शहरात सध्या सुमारे पावणे तीन लाख भटक्या कुत्र्यांची संख्या आहे. ही संख्या तीन लाखाच्या घरात जाण्याची शक्यता असल्याचे पुणे महापालिकेचे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. सारिका फुंडे यांनी सांगितले.

पान ३ वर...



> **महापालिकेत समाविष्ट झालेल्या ३४ गावामधील भटक्या कुत्र्यांची गणना करण्यात आली. नवीन गावांची हद्द मोठी आहे. त्यामुळे भटक्या कुत्र्यांची संख्या सुद्धा मोठी असण्याची होती. त्यामुळे भटक्या कुत्र्यांची संख्या तीन लाखाच्या घरात जाण्याची शक्यता आहे.**
> **- डॉ. सारिका फुंडे पशुवैद्यकीय अधिकारी, आरोग्य विभाग, पुणे महानगरपालिका**

### पशू पक्ष्यांना खायला घालणे हा घटनात्मक अधिकार

**भारतीय राज्यघटनेच्या कलम ५१ ( ए) जी नुसार कोणत्याही प्राणी प्रेमीला पशू, पक्ष्यांना खाद्य देण्यापासून रोखतां येणार नाही. प्राणी आणि पक्ष्यांना खायला घालणे हा सर्व प्राणी प्रेमींचा घटनात्मक अधिकार आहे. त्यामुळे कोणत्याही प्राणी प्रेमीला प्राणी आणि पक्ष्यांना खायला देण्यापासून थांबवणे आणि त्यांना कोणत्याही प्रकारचे मानसीक त्रास देणे किंवा शारीरिक इजा करणे कायद्याने गुन्हा आहे. याची जनजागृती करण्याचे आदेश ॲनिमल वेल्फअर सर्व महापालिकांना दिले आहेत. शहरातील रस्त्याच्याकडेला असलेल्या आजारी व जखमी प्राण्यांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन करा. पोलीस व अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांसह लोकांमध्ये जागृती करा असे आदेश आहेत. गुरांना ऑक्सिटॉक्सिन इंजेक्शन देऊ नका ते अन्न व औषध प्रतिबंध कायद्याप्रमाणे गुन्हा आहे. याबाबत आरोग्य विभागाने जनजागृती करणे अपेक्षित आहे. रेबीज प्रतिबंधक लस भटक्या कुत्र्यांना द्या यासह पाळीव प्राणी विशेषतः कुत्रा व मांजरांच्या नसबंदी बाबत ॲनिमल बर्थ कंट्रोल प्रोग्राम अंतर्गत महापालिका येत्या वर्षभरात विविध कार्यक्रमांसाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आलेली आहे.**



# न्यायालयाचा आदेश धाब्यावर बसवून शेतकऱ्यांची गुरं गायब

## सदाभाऊ खोतांचे पोलिस ठाण्यात ठिय्या आंदोलन

**पुणे । प्रतिनिधी**

न्यायालयाने शेतकऱ्यांना जप्त जनावरे परत द्यायचा आदेश दिल्यानंतरही संबंधित गुरे गायब असल्याचा आरोप करत, प्रख्यात शेतकरी नेते आणि विधान परिषदेचे सदस्य सदाभाऊ खोत यांनी सोमवारी सिंहगड पोलिस ठाण्यात ठिय्या आंदोलन छेडले. फुरसुंगी जवळील भेकराई नगर येथील द्वारकाधीश गोशाळेत शेतकऱ्यांसोबत भेट देताना त्यांच्यावर हल्ल्याचा प्रयत्न झाल्याचे खोत यांनी सांगितले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सिंहगड पोलिस ठाण्यात दाखल झालेल्या गुन्ह्यात जप्त केलेली २१ म्हशी भेकराई नगर येथील द्वारकाधीश गोशाळेत ठेवण्यात आली होती. न्यायालयाच्या

पान ३ वर...

संपादकीय....



## राज्यातील तंत्र शिक्षण विभागात कोट्यवधी रूपयांचा घोटाळा

राज्यातील महापालिका, नगरपालिका, नगरपरिषदा , जिल्हा परिषदा अशा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या (लोकल बॉडी ) 'विकास कामांचे ऑडिट' हे सरकारी तंत्रनिकेतने व आभियांत्रिकी महाविद्यालये मार्फत करण्यात येते. हे ऑडिट झाल्यानंतर महापालिका, नगरपालिका, नगरपरिषदा , जिल्हा परिषदा ह्या शासकीय तंत्रनिकेतने व आभियांत्रिकी महाविद्यालयांना त्यांच्या कामाचा मोबदला म्हणून यांना वीस टक्के मानधन दिले जाते. मात्र, थर्डपार्टी संस्था अनेक रिपोर्ट महाविद्यालयातच बसून बनवले जात आहेत. यासह ठेकेदाराच्या मर्जीप्रमाणे तयार केले जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आले आहे. त्यामुळे 'विकासकामे' निकृष्ट दर्जाची होत आहेत. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमधील कोट्यवधी रुपये खर्च करून बांधलेल्या इमारतींचे , रस्ते, पूल निकृष्टदर्जाची असल्यामुळे धोकादायक स्थितीत किंवा अल्पआयुष्य ठरत असल्याचे वास्तव आहे.

महापालिका, नगरपालिका, नगरपरिषदा व जिल्हा परिषदा यांचा अर्थसंकल्प कोटयावधी रूपयांचा असतो. यासह या स्थानिक स्वराज्य संस्थांना केंद्र व राज्य सरकाकडून देखील थेट निधी मिळत असतो. दरवर्षी स्थानिक स्वराज्य मिळत असतो. यानिधी मधुन ते विविध विकासकामे करतात. ही विकासकामे चांगली दर्जेदार व्हावीत म्हणून या कामांचे थर्डपार्टी ऑडिट केले जाते. हे ऑडिट राज्यातील सरकारी तंत्रनिकेतन व आभियांत्रिकी महाविद्यालयांच्या मार्फत केले जाते. महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, कर्मचारी करतात. त्या मोबदल्यात त्यांना त्यांच्या वार्षिक पगाराच्या वीस टक्के टक्के मानधन दिले जाते. मात्र, अनेक प्राध्यापकांनी कार्यालयातच बसूनच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासकामांचे ऑडिट केले आहे. धक्कादायक बाब म्हणजे ठेकेदारांच्या मर्जी प्रमाणे हे ऑडिट केल्याचे उघड झाले आहे.

सरकारी निर्णया नुसार ३१ मे २००३ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना त्यांच्या वार्षिक एकूण मुळ वेतनाच्या वीस टक्के रक्कम घेता येते. म्हणजेच प्राचार्य, शिक्षक यांना जास्तीत जास्त सहा लाख घेता येते. मात्र, सामाजिक कार्यकर्ते अभिजित खेडकर व डॉ. अभिषेक हरिदास यांनी राज्यातील माहिती मागवली असता अनेक प्राचार्य व शिक्षकांनी कोटयावधी रुपये मानधन घेतले असल्याची माहिती 'माहिती अधिकारात' मिळाली आहे. ही रक्कम म्हणजे पगाराच्या दुप्पट, तिप्पट तर कोठे दहापट देखील मानधन घेतले आहे. महाविद्यालयातील चर्तुथ कर्मचारी सुद्धा मालामाल झाले आहेत.

यात सर्वात गंभीर बाब म्हणजे, हे मानधन घेताना ना शासनाच्या नियमांचे पालन केले जाते, ना प्रत्यक्ष साइट व्हिजिट केली जाते. अनेकदा फक्त कागदोपत्री कामे पूर्ण झाल्याचे दाखवून ऑडिट रिपोर्ट तयार केला जातो. परिणामी ठेकेदारांना मोकळे मैदान मिळते आणि निकृष्ट दर्जाची कामे डोळ्यासमोर उभी राहतात.

सामाजिक कार्यकर्त्यांच्या मते, अशा प्रकारचा भ्रष्टाचार केवळ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निधीची लूट करत नाही, तर तो थेट नागरिकांच्या सुरक्षेलाही धोका निर्माण करतो. पावसाळ्यात दरवर्षी कोसळणारे पूल, उखडणारे रस्ते, फुटणाऱ्या जलवाहिन्या हे याच निकृष्ट दर्जाच्या विकासकामांचे पुरावे आहेत.

यामुळे आता शासनाने या थर्डपार्टी ऑडिटच्या संपूर्ण प्रक्रियेवर पुनर्विचार करणे अत्यावश्यक झाले आहे. स्वतंत्र आणि पारदर्शक यंत्रणा उभी करून, जबाबदार प्राध्यापक व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई न झाल्यास हा घोटाळा अधिकच वाढेल आणि राज्यातील विकासकामे ही 'भ्रष्टाचाराचे बळी' ठरत राहतील.

त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमधील विकासकामे चांगल्या दर्जाची होताना दिसत नाहीत. दरवर्षी रस्ते, सांडपाणी, जल वाहिन्यांची कामे होत असतात. गल्ली बोळ कॉंक्रीटीकरणाची काम वर्षानुवर्षे होत असतात. त्यामुळे कामासाठी निधीची तरतूद न करता निधीसाठी विकासकामे दाखविली जातात.

**सार्वजनिक बांधकाम विभाग (पीडब्ल्युडी) मोठे भ्रष्टाचाराचे किरण**

सार्वजनिक बांधकाम विभाग (पीडब्ल्यूडी) मध्ये सर्वात जास्त भ्रष्टाचार असल्याचे दस्तुरखुद्द सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अभय ओक यांनी येरवड्यातील फौजदारी न्यायालयाचे उद्घाटन करताना सांगितले होते. त्यांनी सांगितले की जेवढा निधी केंद्र व राज्य सरकार मंजूर करते एवढ्या निधी मध्ये अनेक न्यायालये उभी राहिली असती. याचा अर्थ अप्रत्यक्षपणे किती मोठा भ्रष्टाचार पीडब्ल्यूडी मध्ये आहे हे कळून येते. तर महापालिका, नगरपालिका, नगरपरिषद , ग्रामपंचायत, जिल्हा परिषद येथील विकासकामांची निविदा तीस ते चाळीस टक्क्यांनी कमी भरली जाते. त्यामुळे अशा कामांचे ऑडिट थर्ड पार्टीने केल्यास काय दर्जाचे असणार आहे याची कल्पना केलेलीच बरी.

# पुण्यातील शाळा अंधारात – शिक्षणाचा अपमान, भ्रष्टाचाराचा कहर

पुणे हे शहर आपल्याकडे सांस्कृतिक राजधानी, विद्येचं माहेरघर अशा विशेषणांनी गौरवलं जातं. महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची विचारधारा अंगीकारणार्या महाराष्ट्रात, तेही पुण्यासारख्या ज्ञानपंढरीत जर शाळा अंधारात बुडालेली दिसत असेल, तर ही फक्त प्रशासनाची बेपर्वाई नाही; तर शिक्षणाच्या मूलभूत अधिकारावर झालेला क्रूर अन्याय आहे. सदाशिव पेठेतील महानगरपालिकेची शाळा गेल्या दहा-बारा दिवसांपासून अंधारात आहे. पहिली ते सातवीचे वर्गातील निरागस मुलं अंधारात शिकताहेत, शिक्षक दिव्याशिवाय धडपडत आहेत, तर शेजारीच एका अनधिकृत व्यायामशाळेत दिवे झगमगताहेत. ही विडंबनात्मक अवस्था पाहून मनाला चीड येते आणि प्रश्न पडतो –

हीच का पुण्याच्या शिक्षणपंढरीची कहाणी?

भ्रष्टाचार आणि राजकारणाच्या छायेत मुलांचं भविष्य मुळात या शाळेला दरमहा सात-आठ हजार रुपयांचं वीज बिल येत असे. परंतु अचानक बिल अडीच लाखांवर पोहोचलं. कारण, शाळेच्या इमारतीत अनधिकृत व्यायामशाळा आणि अभ्यासिका चालवली जात होती आणि त्यासाठी शाळेच्या लाईट कनेक्शनचा गैरवापर केला गेला. महावितरणने कलम १२६ अंतर्गत पुणे महापालिकेला लाखोंचा दंड ठोकला आणि शाळेला थेट वीज चोर ठरवलं. महापालिकेचा कोणताही ठावठिकाणा नसताना एका नगरसेवकाच्या कार्यकर्त्यांच्या छत्रछायेखाली हा गैरकारभार सुरू होता. राजकीय पाठबळा मुळे हे सगळं निर्भयपणे घडत राहिलं आणि शेवटी त्याचा फटका थेट विद्यार्थ्यांना बसला.

अंधारात बुडालेली शिक्षण व्यवस्था आज पुण्याच्या हृदयात, फुले-शाहू-आंबेडकर यांच्या महाराष्ट्रात, शाळेच्या वर्गात दिवा लावण्यासाठीही व्यवस्था नाही. पत्र्याच्या शेडमध्ये चार शिक्षिका कसेबसे वर्ग चालवताहेत, फळ नाही, खडू नाही, आणि प्रकाशही नाही. मुलांना अंधारात बसवून शिकवलं जातंय. हा प्रकार केवळ लाजीरवाणा नाही, तर बालहक्कांचा उघड उघड भंग आहे. संविधानानं दिलेला शिक्षणाचा मूलभूत अधिकारच ज्या शहरात हिरावला जातो, त्या शहराला सांस्कृतिक राजधानी म्हणायचा अधिकार आहे का?

**जबाबदार कोण?**

या संपूर्ण घोटाळ्याचं मूळ शोधलं तर तीन स्तरांवर गंभीर प्रश्न निर्माण होतात. नगरसेवक आणि त्यांचे कार्यकर्ते – शाळेच्या इमारतीचा बेकायदेशीर ताबा घेऊन व्यायामशाळा आणि अभ्यासिका चालवणं, शिवाय वीज चोरी करून महापालिकेला दंडाच्या जाळ्यात अडकवणं, ही गुन्हेगारी आहे. महावितरणचे अधिकारी – त्यांच्या संमतीशिवाय किंवा दुर्लक्षाशिवाय इतक्या दिवस वीज चोरी होऊच शकत नाही. महानगरपालिका प्रशासन – शाळेच्या इमारतीवर बेकायदेशीर कब्जा झाला, प्रचंड वीज वापर होतोय, हे लक्षात न घेणं म्हणजे सरळ सरळ बेपर्वाई आणि संगनमत.

या तिघांच्या संगनमतातूनच हा अंधार निर्माण झाला आहे. आणि शेवटी मुलांच्या डोक्यावर हा अन्याय कोसळला आहे. शिक्षणाच्या मंदिरात राजकारणाचं घाणेरडं राजकारण सदाशिव पेठेतील ही घटना एखाद्या वेगळ्या शाळेपुरती मर्यादित नाही. ही तर एक भयावह प्रवृत्तीचं प्रतीक आहे. शाळा, जी समाजासाठी ज्ञानाचं मंदिर आहे, तीच जर राजकारणाच्या 'कब्जा'खाली गेली, तर शिक्षणाचा अर्थ काय उरतो? नगरसेवकांनी समाजसेवेचं नाव घेऊन इमारतींवर कब्जा करावा, व्यायामशाळा चालवावी आणि त्याचा खर्च शाळेच्या हिशोबावर टाकावा – हे समाजकारण नाही, ही सरळसरळ लूट आहे.

मुलांच्या शिक्षणात अडथळा आणून राजकारण करणारं कुठलंही नेतृत्व जनतेसमोर उघडं पडायला हवं. पुण्याचं अपयश – नेते, अधिकारी आणि व्यवस्था या संपूर्ण प्रकरणात शहराचे आमदार, खासदार, नगरसेवक, भाजपचे शहराध्यक्ष, महापालिकेचे आयुक्त, शिक्षण मंडळातील अधिकारी – कोणीही पुढे आले नाही. महापालिकेच्या शाळेत मुलं अंधारात बसलेली असताना, हे सत्ताधारी मात्र डीजे लावण्याच्या संस्कृतीत रमलेत. विकासाच्या घोषणा करायला मात्र कुणीही मागेपुढे पाहत नाही. प्रश्न एवढाच आहे – मुलांच्या हक्कांसाठी, शाळांच्या उजेडासाठी या नेत्यांनी कधी तोंड उघडणार?

**दोषींवर कारवाईची अपरिहार्यता**

ही बाब फक्त तात्पुरत्या उपायांनी मिटवायची नाही. या प्रकरणात खालील कारवाया तात्काळ व्हायला हव्यात – शाळेच्या इमारतीवरचा बेकायदेशीर ताबा हटवून ती पूर्णपणे शिक्षणासाठी वापरली जावी. वीज चोरी प्रकरणी नगरसेवक, त्यांचे कार्यकर्ते आणि संबंधित महावितरण अधिकारी यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करावेत. शाळेला लागलेला दंड पालिका न भरता दोषींनी स्वतः भरावा. शिक्षण विभाग आणि महापालिकेचे वरिष्ठ अधिकारी यांची चौकशी करून जबाबदारी निश्चित केली जावी. हे केल्याशिवाय या शहरातील शाळा अंधारातून बाहेर पडणार नाहीत.

**अंधारातून प्रकाशाकडे – समाजाची जबाबदारी**

या प्रकरणातून एक मोठा प्रश्न उभा राहतो – समाज म्हणून आपण शिक्षणाकडे किती संवेदनशील आहोत? आपल्या भागातली शाळा अंधारात आहे, मुलं दिव्याशिवाय शिकत आहेत, आणि आपण गप्प बसतो – हीच खरी शोकांतिका आहे. शाळा म्हणजे फक्त इमारत नाही; ती पुढच्या पिढीचं भविष्य आहे. पुण्यासारख्या शहरात अशी अवस्था असेल तर ग्रामीण भागात काय चालत असेल याची कल्पनाच करवत नाही.

**शाळा की राजकारण्यांचा खेळाचा मैदान?**

ज्या जागेवर शाळा चालायला हवी, त्या जागेवर नगरसेवकांनी व्यायामशाळा, अभ्यासिका आणि अन्य कार्यक्रमांचं साम्राज्य उभारलं आहे. आणि त्यासाठी शाळेच्या वीजेचा वापर करून महापालिकेलाच चोर ठरवलं गेलं. या विडंबनाला काय म्हणावं? शाळा हे मुलांचं घर आहे; पण आज ते राजकारण्यांच्या खेळाचं मैदान झालं आहे. समाजकारणाच्या नावाखाली राजकारणाचा गवगवा करणार्यांनी मुलांच्या हक्कांवर गदा आणली आहे.

**सांस्कृतिक पुण्याची ही अवस्था?**

पुण्याला आपण अभिमानाने विद्येचं माहेरघर म्हणतो. इथे सावित्रीबाई फुले, महात्मा फुले यांनी स्त्रीशिक्षणाची मशाल पेटवली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाला शस्त्र मानून समाजबदल घडवला. आणि त्याच पुण्यात आज शाळा अंधारात आहे, मुलं दिव्याशिवाय बसली आहेत – हा इतिहासाच्या स्मरणाला घालवलेला तोडगा नाही का? शिक्षणाचं केंद्र असलेल्या शहरात असं दृश्य दिसणं ही फक्त पालिकेची नाही, तर पुणेकरांच्या अभिमानालाच ठेच आहे.

**प्रकाशासाठीची लढाई**

आज या शाळेतील विद्यार्थी दिव्याशिवाय शिकत आहेत, तरीही शिकत आहेत. त्यांची जिद्द हे मोठं वास्तव आहे. परंतु ही जिद्द प्रशासनाच्या संवेदनाहीनतेला झाकू शकत नाही. अंधारातून प्रकाशाकडे नेणं ही केवळ मुलांची नाही, तर आपल्या सगळ्यांची लढाई आहे. समाजाने आवाज उठवला नाही, तर हे अंधाराचं कुलूप कायम राहील. म्हणूनच दोषींवर कठोर कारवाई, शाळेचं तातडीचं पुनरुज्जीवन आणि मुलांना उजेडाचा हक्क – हे तीन पाऊल उचलल्याशिवाय पुण्यातील शिक्षण पवित्र होऊ शकत नाही. पुण्यातील शाळेचा हा प्रकार केवळ एका इमारतीचा, एका नगरसेवकाचा, किंवा एका अधिकार्याचा प्रश्न नाही. हा शिक्षणाला दुय्यम स्थान देणार्या राजकीय संस्कृतीचा प्रश्न आहे. शिक्षणाचा उजेड हा मुलांचा हक्क आहे, तो कुणी हिरावून घेऊ शकत नाही. पुणे महानगरपालिका, राज्य सरकार, आणि संबंधित नेते जर या प्रकरणाकडे डोळेझाक करत राहिले, तर जनतेनेच त्यांना धडा शिकवायला हवा. आज या शाळेतील विद्यार्थी अंधारात बसूनही शिकत आहेत – त्यांची जिद्द आपल्याला प्रेरणा द्यायला हवी. पण त्याच वेळी हा अंधार दूर करण्याची जबाबदारी केवळ शिक्षक किंवा मुलांची नाही; ती संपूर्ण समाजाची आहे. शिक्षणाच्या मंदिरात लावलेला हा अंधाराचा कुलूप फोडायचा असेल, तर दोषींना शिक्षा, भ्रष्टाचाराला आळा, आणि विद्यार्थ्यांना उजेडाचा हक्क – ही तातडीची पावलं उचलावी लागतील. अन्यथा पुण्याच्या सांस्कृतिक राजधानीच्या नावाला काळं पांघरायला जास्त वेळ लागणार नाही.

–विक्रम कदम

# रेडिमेड यशामागे- पालक आणि विद्यार्थी!

माणसे फक्त आपली गरज काय आहे? आवश्यकता काय आहे? याचाच विचार करतात, आपण 'ती गोष्ट ' मिळवायला लायक आहोत, पात्र आहोत की नाही, याचा विचार करत नाहीत'' असे विचार फार पूर्वीच जगातील प्रसिद्ध शूर योद्धा नेपोलियन बोनापार्ट याने व्यक्त करून ठेवले आहेत.

थोर माणसे आणि विचारवंत हे खऱ्या अर्थाने द्रष्टे असतात! नेपोलियनचे हे विचार आजही तंतोतंत लागू पडतात, असे दिसून येईल! आजही लोक आपली पात्रता वाढविण्यापेक्षा, आपली योग्यता काय आहे? हे बघण्यापेक्षा 'त त्याला मिळाले, मग मलाही मिळाले पाहिजे, अशी अपेक्षा करतात! एका वर्गात ५० साठ तरी विद्यार्थी असतात. काही शाळांमध्ये तर सत्तर वा त्याहून अधिक पटसंख्या असते. एकच गुरू सर्वांना शिकवत असतात. असे असताना सर्वांचा पहिला क्रमांक येत नाही. का बरं? हाच तर पालक आणि विद्यार्थ्यांसाठीचा आत्मपरीक्षणाचा आणि कळीचा मुद्दा आहे.

शरद पवार बिएमसीसी विद्यार्थी म्हणून, ज्यांना ज्यांना मुख्यमंत्री होण्याची इच्छा आहे, त्यांनी बीएमसीसीत प्रवेश घेतल्यास ते सर्व मुख्यमंत्री होतील का? असा सारासार विचार न करता बहुतेक पालक ''सेलिब्रिटीं अभिनेत्यांनी, कलाकारांनी उघडलेल्या अभिनय, नृत्य इत्यादी कला संस्थांतून प्रवेश घेताना दिसतात. '' आम्ही तुमच्याकडे प्रवेश घेऊ पण आम्हाला, आमच्या पाल्याला 'हिरो' बनवणार का? सेलिब्रिटी बनवणार का ? अशी जादू करू शकत असाल, तरच आम्ही तुमच्याकडे प्रवेश घेऊ,'' अशा अजब अटी पालक विद्यार्थी घालत असल्याने, आणि त्यांनाही संस्था चालवायची असल्याने, नाइलाजाने बरेच जण अशा अवाजवी अटी मान्य करतात आणि पालक विद्यार्थ्यांच्या मोहाला बळी पडतात. आणि आवाक्या बाहेरची आश्वासने , असे संस्थाचालक देऊन बसतात. कारण अशी आश्वासने पालकच त्यांच्याकडून वदवून घेतात. कारण त्यांना तयार सेलिब्रिटींकडून रेडिमेड यश, रेडिमेड लोकप्रियता, रेडिमेड पैसा हवा असतो!

मग विचार करा, ''आम्ही तुम्हाला 'हे' बनवतो, 'ते' बनवतो, एवढेच नव्हे तर एकवीस दिवसात पैसे डबल करून देतो, अशा जाहिराती संस्था, या समाजातील 'शॉर्टकट' यश शोधणाऱ्या व्यक्तींना बळी पडल्याचेच द्योतक नव्हे काय?

तेंव्हा रेडिमेड यशाच्या शोधात फिरणाऱ्या विद्यार्थी पालकांनी नक्कीच आत्मपरीक्षण करावे आणि यशस्वी होण्यासाठी कुठलाही शॉर्ट कट नसतो! हे जाणून घ्यावे!

असे रेडिमेड आणि ताबडतोब यश मिळविणाऱ्या लोकांच्या शोधात अलीकडच्या काळात सोशल मीडिया आणि नेटवरूनच ''मोहाचे जाळे- गळ' टाकून अनेक सुशिक्षित आणि सराईत सायबर क्राईम करणारे छुपे चेहरे, अति लोभी लोकांना रोज गंडा घालत आहेत. हे प्रमाण एवढे वाढले कि सरकारला, मोबाईलवरून हे संदेश व्हायरल करावे लागत आहेत. तेव्हा अधिक इंटरेस्ट देतो, पैसे डबल करून देतो, या बरोबरच डिजिटल अटक करू अशा धमक्याही येतात!

मोहापायी लोकं लाईफ इन्शुरन्स सारख्या प्रामाणिक अर्थसंस्थेत कमी रिटर्न मिळते म्हणून अशा डबल पैसे करणाऱ्या लोकांकडे पैसा ठेवतात आणि मग हाती येतो भ्रमाचा मोठा भोपळा!


म्हणून कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी सविस्तर अभ्यास, जाणकारांकडून योग्य मार्गदर्शन घेऊन, अंतिमतः योग्य विचार करून, योग्य निर्णय घेतल्याने निदान यशा पर्यंत पोचता तरी येईल!

वाट चुकण्या आधी पाच ठिकाणी विचारले तर बिघडले कुठे?

– श्रीकांत वाघ

पक्ष्यांची ओळख

## ब्राह्मणी मैना / भांगपाडी मैना




हि मैना साळुंकी या मैने पेक्षा आकाराने जरा लहान असते. या मैनेच्या पाठीवरील रंग फिकट तपकिरी व राखी असून गळ्यापासून पोटाखालील भाग तपकिरी तांबूस रंगाचा असतो. काळ्या डोळ्यांवर आकाशी रंगाची गोल रिंग असते. डोक्यावर काळ्या रंगाच्या बारीक पिसांचा झुपकेदार व तकतकित असा तुरा असतो. हा तुरा अगदी केस विंचरल्या प्रमाणे दिसतो. म्हणूनच या मैनेला भांगपाडी मैना म्हणून ओळखले जाते. चोच सुरवातीस करडी तर टोकास पिवळ्या रंगाची असते. पाय पिवळ्या रंगाचे असतात. शेपटीमध्ये काळ्या रंगाच्या कडा व टोकास पांढरी पिसे असतात. जोडीने व समूहाने हे पक्षी वावरतात. विरळ जंगलांच्या परिसरात व उद्यानांतून सहज आढळतात. गवताळ भागात भक्ष्याच्या शोधात असताना दिसतात. कीटक व लहान फळे हे मुख्य खाद्य होय. क्रिक – क्रिक, – क्रिक – क्रिक असा आवाज काढत गातानाही दिसतात.

विणीचा हंगाम– मे ते जुलै.

**– दिपक शिंदे. (पक्षिमित्र व निसर्ग अभ्यासक)**

# कोट्यावधी लोक दररोज पितात दूषित पाणी !

राज्यातील शहर असो किंवा गाव येथील शेवटच्या माणसापर्यंत शुद्ध पाणीपुरवठा करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था किंवा महापालिकेची कमी पडत आहे. राज्यातील शहरांसह ग्रामिण भागातील मोठ्या प्रमाणात दूषित पाणीपुरवठा होत असल्याचा अहवाल राज्याचे सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेने दिला आहे. पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या हद्दीतील तपासलेल्या एक टक्का पिण्याच्या पाण्याचे नमूने दूषित आहेत. तर पुणे जिल्ह्यातील ३.३ टक्के पाण्याचे नमूने दूषित आहेत. यासह राज्यातील अनेक गावात ग्रामपंचायत, नगरपालिका, पंचायत समिती, जिल्हा परिषद, महापालिका हद्दीत कोटयावधी अबालवृद्ध दूषित पाणी पित आहेत. त्यामुळे दूषित पाण्यामुळे होणारे आजार त्यावर होणारा कोट्यावधी रूपयांचा खर्च वेगळा म्हणावे लागले.

राज्यातील सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेत नागरिकांना पाणीपुरवठा केलेल्या जाणाऱ्या पिण्याच्या पाण्याचे नूमन्यांचे अणूजीव व रासायनिक घटकांचे विश्लेषण करून शास्त्रतोक्तपणे तपासणी केली जाते. आरोग्य प्रयोगशाळेसह राज्यात मिनी, उपविभागीय व महापालिकेचे प्रयोगशाळा आहेत. या प्रयोगशाळेत रॅंडमली स्थानिक स्वराज्य संस्था पाणीपुरवठा करणाऱ्या पिण्याच्या पाण्याच्या नमूने नियमित तपासले जातात. पाण्याचे नमूने तपासून संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना उपायोजनांसंदर्भात सांगितले जाते. मात्र, यावर उपाययोजना होतेच याची काही शाश्वती देता येत नाही. कारण पुढीच्या वेळी पाणीपुरवठा होणाऱ्या इतर ठिकाणचे पिण्याच्या पाण्याचे नमूने तपासणीसाठी पाठविले जाते. यामध्ये मिनी, उपविभागीय व महापालिकेच्या



प्रयोगशाळेत पिण्याच्या पाण्याचे नमूने तपासल्यानंतर राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेत हे पाणी नमूने पाठविले जाते. त्यामुळे शंभर टक्के पिण्याच्या पाण्याचे नमूने तपासणीचा अहवाल मिळेल याची खात्री नसते. राज्य आरोग्य प्रयोगशाळेला जानेवारी २०२५ मध्ये पुणे व पिंपरी -चिंचवड महापालिकेच्या हद्दीतून १६ हजार ८५१ पिण्याच्या पाण्याचे नमूने प्राप्त झाले होते. त्यापैकी एक टक्का पाण्याचे नमुने दूषित होते. तर ग्रामिण भागातील तीन हजार ४४५ पिण्याच्या पाण्याच्या नमून्यांपैकी साधारणत: साडेतीन टक्के पाणी नमूने दूषित असल्याचा अहवाल राज्य प्रयोगशाळेने दिला आहे. पुणे जिल्ह्यातील सुमारे एक कोटी लोकसंख्येचा विचार केला तर तब्बल दररोज चार लाख लोक दूषित पाणी पित असल्याचे दिसून येते. त्यामुळे दूषित पाण्यामुळे होणारे आजार व त्यावरील औषधोपचारासाठी लोकांचे कोट्यावधी रूपये खर्च होत असल्याचा अंदाच वैद्यकीय तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे.

राज्य प्रयोगशाळेत राज्यभरातून आलेल्या शहर व ग्रामिण भागातील पिण्याच्या पाण्याच्या नमून्यांचे अणूजीव व रासायनिक घटकांची तपासणी केली जाते. दर महिन्याला त्याचा अहवाल आरोग्य संचालकांना पाठविला जातो. अनेक शहरात व ग्रामिण भागात होण्याऱ्या सार्वजनिक पाणीपुरवठ्यातील पिण्याचे पाण्याचे नमूने तपासणी करून संबंधितांना त्यावर उपाययोजना करण्यासाठी सांगितले जाते पण काही उपयोग होत नाही. राज्यातील नांदेड जिल्ह्यात २६.४ टक्के, बीड जिल्ह्यात १८.७ टक्के, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) मध्ये १६.६ टक्के, जालना १२ टक्के तर उस्मानाबाद १७.७ टक्के दूषित पाणीपुरवठा होतो. कोकणातील रत्नागिरीत ११ टक्के तर सिंधुदुर्ग जिल्ह्यात १२ टक्के दूषित पाणीपुरवठा होते. तर ठाणे शहरात १६.७ टक्के, भंडारा २२.२ व गोंदियातील तीस टक्के शहरी भागात दूषित पाणीपुरवठा होत असल्याचा अहवाल राज्य प्रयोगशाळेने दिला आहे. दूषित पाण्यामुळे काविळ, अतिसार, विषमज्वर सारखे आजार होऊ शकतात. पाण्याचे क्लोरिनेशन नीट झाले नसल्यास अपचनाचे विकार होऊ शकतात. त्यासाठी प्रशासनाने पिण्याच्या पाण्याचे चांगल्या पद्धतीने क्लोरिनेशन करून पाणी शंभर टक्के उकळून व थंड करून पिणे आवश्यक आहे.

'दैनिक महा मेट्रो', मालक, प्रकाशक, संपादक दिलीप किसन कुऱ्हाडे, यांनी श्री समर्थ प्रिंटर्स, शॉप नंबर १, बेसमेंट वर्तक अपार्टमेंट, ४९९, शनिवार पेठ, पुणे- ४११०३० येथे छापून फ्लॅट नंबर ९, फ्रेंन्ड्स पॅराडाईज, शिरोळे रोड, शिवाजीनगर, पुणे ४११००४ येथे प्रकाशित केले.
वृत्तपत्रात छापलेल्या बातम्या, लेख, छायाचित्रे व जाहिराती यांच्याशी संपादक सहमत असेल असे नाही. कायदेशीर प्रकरणे पुणे न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.
मालक, प्रकाशक आणि संपादक दिलीप किसन कुऱ्हाडे – ९९२२९३०१९५, कार्यालय संपर्क क्रमांक : ९९७०६८८८६५ ( पी.आर.बी. कायद्याअंतर्गत बातम्याच्या निवडीसाठी जबाबदार.) Email : Mahametronews.pune1gmail.com

This 'Daily Maha Metro', Owner, Publisher by Dilip Kisan Kurhade printed at Shree Samarth Printers, Shop No. 1, Basement Vartak partment, 499, Shaniwar Peth, Pune 411030, Published from Flat No. 9, Friends Paradise Society, Shirole Road, Shivajinagar, Pune-411004.The editor does not necessarily agree with the news, articles, photographs and advertisements printed in the newspaper. Legal matters will be resolved under Pune Courts. Owner, Publisher Editor Dilip Kisan Kurhade Contact No. - 9922930195, Office Contact No. - 9970688865 (Responsible for selection of news under PRB ct.) Email. - Mahametronews.pune@1gmail.com

पान १ वरून

### मानाच्या गणपतींच्या प्राणप्रतिष्ठा, भक्तीचा जल्लोष सुरू

श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती बाप्पाची आगमन मिरवणूक सकाळी साडेआठ वाजता सुरू होईल. आकर्षक फुलांच्या रथातून श्रींचं आगमन होईल. यंदा १३३वे वर्ष असून केरळमधील श्री पद्मनाभ स्वामी मंदिराची प्रतिकृती साकारली आहे. प्राणप्रतिष्ठापना सकाळी ११ वाजून ११ मिनिटांनी स्वामी घनश्यामाचार्य महाराज यांच्या हस्ते केली जाणार आहे. अखिल मंडई मंडळाचं यंदा १३२वं वर्ष असून सकाळी १० वाजता भव्य मयूर रथातून मिरवणूक होईल. दुपारी १२ वाजता नवीन चंद्र आणि स्नेहल मेहकर यांच्या हस्ते प्राणप्रतिष्ठापना होणार आहे. श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्टची मिरवणूक सकाळी साडेआठ वाजता सुरू होणार आहे. मर्दानी खेळ आणि ढोल-ताशांच्या गजरात श्रींचं आगमन होईल. दुपारी १२ वाजून १५ मिनिटांनी प्रसिद्ध आध्यात्मिक वक्त्या जया किशोरी यांच्या हस्ते प्राणप्रतिष्ठापना पार पडणार आहे.

### 'डेक्कन'ला न मिळालेल्या टीडीआरची विक्री थांबविली

तेवढ्याच जागेचा २२ हजार ७१० चौरस मीटरचा टीडीआर ( विकास हस्तांतरण हक्क) दिला. कॅालेजच्या विश्वस्तांचा ठराव व धर्मादाय आयुक्त कार्यालयाने त्या जागेच्या २०२०-२०२१ या वर्षात टीडीआरचा लिलाव केला. यामध्ये पुष्पा प्रॅापर्टी व कुणाल बिल्डरने तब्बल पाच कोटी ३३ लाख रूपये मोजून ११ हजार २७५ चौरस मिटर टीडीआर विकत घेतला. त्यानंतर उर्वरित ११ हजार २७५ चौरस मिटर जागेचा टीडीआर विकत घेण्यासाठी धर्मादाय आयुक्त कार्यालयाने संबंधित बिल्डरला सहा महिन्यांची मुदत दिली. दरम्यान मुदत उलटून गेल्याने हा व्यवहार रद्द झाला. तर उर्वरित ११ हजार २७५ चौरस मिटर जागेचा महापालिकेने दुप्पट टीडीआर केला. तर आजच्या बाजार भावाप्रमाणे व रेडीरेकनर प्रमाणे २२ हजार ७१० चौरस मिटरच्या टीडीआर ची किंमत तब्बल ५३ कोटी रुपये झाली. या टीडीआरची विक्री करायची झाल्यास डेक्कनकॅालेजच्या विश्वस्तांचा ठराव करणे, त्यानंतर धर्मादाय आयुक्तांनी या टीडीआर चा लिलाव करणे क्रमप्राप्त आहे. यासाठी महापालिकेची डेक्कन कॅालेजला टीडीआर देणे आवश्यक होते. मात्र या सर्व नियम गुंडाळून डेक्कनकॅालजच्या तत्कालीन कुलगुरू प्रमोदकुमार पांडे यांनी परस्पर रजिस्टारला हाताशी धरून टीडीआर विक्रीचा घाट घातला. त्यासाठी आगाऊ ( अॅडव्हास) रक्कम म्हणून ३३ लाख रूपयांचा धनादेश डेक्कन कॅालेजच्या बँक खात्यामध्ये वटवला आहे.

### हिंजवडी तील रस्त्यांची झाली दुरवस्था

देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने या प्रश्नात लक्ष घालून ठोस पावले उचलावीत.'' सुळे पुढे म्हणाल्या, ''हिंजवडीतील रस्त्यांची परिस्थिती अत्यंत बिकट आहे. ठिकठिकाणी खड्डे असून, अतिक्रमण कारवाईनंतरचा राडारोडा रस्त्यावरच टाकलेला आहे. याशिवाय वीजपुरवठाही सुरळीत नाही, सुरक्षिततेचे भान नाही. लाखो लोक दररोज येथे कामासाठी प्रवास करतात. कोट्यवधी रुपयांची उलाढाल होते, परदेशात माल निर्यात केला जातो. अशा महत्त्वाच्या आयटी पार्कची दुर्दशा ही राज्य सरकारच्या निष्काळजीपणाचे द्योतक आहे.'' त्यांनी अधोरेखित केले की, माजी मुख्यमंत्री शरद पवार यांच्या प्रयत्नांमुळे हिंजवडीला आंतरराष्ट्रीय स्तरावर 'आयटी हब' म्हणून ओळख मिळाली. मात्र सध्या येथील परिस्थितीमुळे राजीव गांधी इन्फोटेक पार्कचे नाव खराब होत असून राज्य सरकारचे अपयश जगासमोर उघड होत आहे.

### पुणे-दिल्ली विमानात खिडकीचे पॅनल सैल

असल्याने विमानाच्या दाबावर किंवा रचनात्मक सुरक्षिततेवर थेट परिणाम होत नाही, मात्र देखभाल प्रक्रियेत त्रुटी आणि निष्काळजीपणाचे संकेत यातून मिळतात. अशा किरकोळ त्रुट्याही प्रवाशांच्या विश्वासाला धक्का देऊ शकतात, असे तज्ज्ञांनी नमूद केले. अशी घटना प्रथमच घडलेली नाही. यापूर्वीही पुण्याकडे जाणाऱ्या विमानात हवेत खिडकीच्या पॅनलसंबंधी समस्या निर्माण झाली होती. विमान सुरक्षितपणे उतरले असले तरी, प्रवाशांचा विश्वास डळमळीत झाल्याचे स्पष्ट झाले.

### पुणे महापालिकेच्या हद्दीत तीन लाख भटकी कुत्री

पुणे शहरात २०१८ मध्ये रेस्क्यू चॅरिटेबल ट्रस्ट (RESQCT) ने भटक्या कुत्र्यांची गणना केली होती. यामध्ये तीन लाख १५ हजार भटक्या कुत्र्यांची संख्या होती. दरम्यान कोव्हिड काळात भटक्या कुत्र्यांची उपासमार होऊन अनेकांचा मृत्यू झाला. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या हद्दीत ९० हजार भटक्या कुत्र्यांची संख्या आहे. लोकसंख्येच्या तुलनेत तीन टक्के भटक्या कुत्र्याची संख्या असावी असा नियम अॅनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडियाचा असल्याचे पिंपरी चिंचवड महापालिका आरोग्य विभागाचे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. अरूण दगडे यांनी सांगितले. अॅनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडिया (अथइजख) ने देशातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना विशेषतः महापालिकांना भटक्या कुत्र्यांची व मांजरांची काळजी व देखभालीसाठी मार्गदर्शक तत्वे दिलेली आहेत. अॅनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे पोलीस व कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्यांना आदेश दिले आहेत. यामध्ये प्राण्याला दगड मारणे, लाथ किंवा काठीने मारहाण करणे, प्राण्याला त्याच्या ठिकाणाहून हाकलून लावले, पाठलाग केला तर प्राणी क्रुरता अधिनियम अंतर्गत गुन्हा आहे. भारतीय दंड संहिता ४२९ नुसार , प्राण्यांवरील क्रुरता हा दंडनीय गुन्हा आहे. यामध्ये दंडासह शिक्षा पाच वर्षापर्यंत वाढू शकते. असे फलक पुणे शहर पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस ठाण्याबाहेर लावण्यात आली आहेत.

### न्यायालयाचा आदेश धाब्यावर बसवून शेतकऱ्यांची गुरं गायब

आदेशानुसार शेतकरी या गुरांना परत घेण्यासाठी गोशाळेत गेले असता त्यांना गुरे आढळून आली नाहीत. यावेळी खोत स्वतः शेतकऱ्यांसोबत उपस्थित होते. त्यांनी पोलिसांना पंचनामा करण्याची मागणी केली. मात्र, गोशाळेचा मालक अनुपस्थित असताना काही लोकांनी जमाव करून शेतकऱ्यांशी झटापट केल्याचा आरोप खोत यांनी केला. मी हिंदू आहे, मराठा आहे, आम्ही गायीला आई मानतो. आम्ही खऱ्या गौरक्षकांचा आदर करतो. पण काही स्वयंघोषित गौरक्षक कायद्याचे उल्लंघन करून शेतकऱ्यांना त्रास देत आहेत. गुरं गायब झालीत, शेतकऱ्यांचा पंचनामा करायचा तर आमच्यावरच हल्ला करतात, हा प्रकार असह्य आहे, असे खोत यांनी सांगितले.

पोलिसांच्या मते, खोत पत्रकारांशी बोलत असताना काही गौरक्षकांनी त्यांना आपले म्हणणे ऐकून घेण्याची विनंती केली. खोत घटनास्थळावरून निघत असताना वाद वाढला आणि तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून पोलिसांना हस्तक्षेप करावा लागला. पोलिसांनी मात्र गोशाळेत कोणताही हाणामारीचा प्रकार झाला नाही असे स्पष्ट केले. त्यानंतर खोत व शेतकरी सिंहगड पोलिस ठाण्यात दाखल झाले. त्यांनी ठिय्या आंदोलन करत गुरांच्या अनुपस्थितीबद्दल कडक नाराजी व्यक्त केली.

# टीव्हीएस शोरूमला आग, ६० दुचाकींची राखरांगोळी!

**पुणे । प्रतिनिधी**

शहराच्या मध्यवर्ती भागातील बंड गार्डन रोड सोमवारी रात्री भीषण आगीच्या घटनेने थरारला. प्रोफेशनल टीव्हीएस मोटर शोरूम व सर्व्हिस सेंटरला लागलेल्या आगीत तब्बल ६० दुचाकी जळून खाक झाल्या. शोरूममधून उसळणाऱ्या ज्वाळा आणि दाट धुरामुळे परिसरात काही काळ भीतीचं वातावरण निर्माण झालं होतं.





आगीची माहिती रात्री साडेआठ वाजता अग्निशमन नियंत्रण कक्षाला मिळताच, अग्निशमन दलाच्या १० हून अधिक गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. जवानांनी अवघड परिस्थितीशी झुंज देत आगीवर नियंत्रण मिळवले. सर्व्हिस सेंटरमध्ये अडकलेल्या एका व्यक्तीला थरारक क्षणी सुरक्षित बाहेर काढण्यात दलाला यश आलं. सुदैवाने मोठी जीवितहानी टळली.

या आगीत नवीन व जुन्या इलेक्ट्रिक आणि पेट्रोलवर चालणाऱ्या दुचाकींसह वाहनांचे सुटे भाग, फर्निचर, इलेक्ट्रॉनिक गॅझेट्स पूर्णपणे भस्मसात झाले. लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून, शॉर्टसर्किटचा प्राथमिक अंदाज वर्तवला जात आहे. पुणे शहर पोलिस आणि महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी यांनी घटनास्थळी धाव घेऊन अग्निशमन दलाला मदत केली. रात्री अचानक उसळलेल्या या आगीमुळे बंड गार्डन रोडवर मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी झाली होती. उशिरा रात्रीपर्यंत अग्निशमन दलाचे जवान थंडावलेल्या अवशेषांवर पाणी टाकत होते. पुण्यातील या भीषण आगीने पुन्हा एकदा सुरक्षाव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उभे केले आहे.



## वाहतूक पोलिस व रिक्षाचालकांच्या धाडसाने पीएमपीएमएल चालकाचे प्राण वाचले

**पुणे । प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या खरेदीच्या गर्दीत सोमवारी सायंकाळी बेलबाग चौकात एक नाट्यमय प्रसंग घडला.

पीएमपीएमएल बसचा चालक अनिल लक्ष्मण अंबुरे (४१, रा. वारजे माळवाडी) यांना अचानक हृदयविकाराचा झटका आला. चालक बस चालवत असतानाच बेशुद्ध पडल्याने प्रवाशांत एकच खळबळ उडाली. गंभीर प्रसंग ओळखून वाहतूक पोलिस कॉन्स्टेबल रोमेश धावरे आणि अर्चना निमगरे यांनी तत्काळ धाव घेतली. त्यांनी अंबुरे यांना बसबाहेर काढून फुटपाथवर आणले व प्राथमिक उपचार दिले. मात्र, प्रचंड गर्दीमुळे रुग्णवाहिका घटनास्थळी पोहोचू शकत नव्हती. अशा वेळी मानवतेचा हात पुढे करीत रिक्षाचालक राजेश शंकर अर्कल यांनी स्वतःची रिक्षा उपलब्ध करून दिली. पोलिसांच्या मदतीने अंबुरे यांना जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले. वेळेत वैद्यकीय मदत मिळाल्याने त्यांचे प्राण वाचले.

## शाळेतील विद्यार्थ्यांच्या हातून घडले पर्यावरणपूरक गणपती बाप्पा

**चिंचवड। प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अंतर्गत शाळांमध्ये गणेशोत्सवाचे औचित्य साधून पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत शाडू माती आणि कागदापासून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.




या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवत आपल्या कल्पनाशक्तीला व कलागुणांना वाव देत पर्यावरणपूरक गणेश मूर्ती तयार केली. पर्यावरणपूरक गणेशोत्सवाबाबत जनजागृती करणे, पर्यावरणपूरक मूर्तींना प्रोत्साहन देणे, त्याचे महत्त्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे, हे या कार्यशाळेचे मुख्य उद्दिष्ट होते.

कार्यशाळेत शिक्षक व मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक मूर्ती घडविण्याची संपूर्ण प्रक्रिया प्रत्यक्ष दाखवून दिली. मूर्ती घडवताना कोणती काळजी घ्यावी, आकारनिर्मिती करताना कोणते बारकावे पाळावेत, मूर्तीची सुरक्षित देखभाल कशी करावी, तसेच मूर्ती विसर्जन करताना पर्यावरणाला हानी पोहोचणार नाही अशा पद्धतींचा अवलंब कसा करावा, याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना फक्त गणेशमूर्ती बनविण्याची कला नाही तर पर्यावरण संरक्षणाची जबाबदारीही समजावून सांगण्यात आली. शाळांमध्ये आयोजित या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. शाडू माती व कागदापासून प्रत्यक्ष काम करताना त्यांनी आपल्या कल्पनाशक्तीचा वापर करून विविधरंगी बाप्पा साकारले.

> **"विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक साकारलेला बाप्पा म्हणजे केवळ मूर्ती नव्हे, तर हरित विचारांचा पाया आहे. या छोट्याशा कृतीतून मोठा संदेश दडलेला आहे. आनंद साजरा करताना निसर्गाचे रक्षण करणे आपली जबाबदारी असून हा संदेश देण्यासाठी अशा कार्यशाळा उपयुक्त ठरतात.**
> **- प्रदीप जांभळे पाटील,**
> **अतिरिक्त आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका**

> **"विद्यार्थ्यांच्या हातून साकार झालेल्या पर्यावरणपूरक मातीच्या गणेशमूर्ती केवळ कला नाहीत, तर पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संदेश देतात. कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवत आपल्या कल्पनाशक्तीला व कलागुणांना वाव देत पर्यावरणपूरक गणेश मूर्ती तयार करीत एकप्रकारे पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचा संदेश दिला आहे.**
> **- किरणकुमार मोरे, सहायक आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका**



## स्थायी समिती बैठकीत विविध विषयांना मान्यता

**चिंचवड । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृहात स्थायी समितीची बैठक संपन्न झाली, बैठकीच्या अध्यक्षस्थानी प्रशासक शेखर सिंह होते. यावेळी सादर करण्यात आलेल्या विविध विषयांची माहिती घेत आयुक्त शेखर सिंह यांनी मान्यता दिली व शहरात सुरु असलेल्या विकासकामांचा विभागनिहाय आढावाही घेतला.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर,नगरसचिव मुकेश कोळप तसेच विषयाशी संबंधित विभागप्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते. आज झालेल्या स्थायी समिती बैठकीत पी एम पी एल संस्थेस विविध पासेसची रक्कम अदा करणे, ड गटातील वाहनांच्या दुरुस्ती कामी निविदा कालावधीत मुदतवाढ देणे, प्रभाग क्रमांक ८ मधील विविध कार्यक्रमांसाठी मंडप व्यवस्था करणे या कामाच्या सुधारित अंदाजपत्रकात मान्यता देणेकामी महानगरपालिकेच्या सभेकडे शिफारस करणे आदी विषयांना येणाऱ्या खर्चास प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली.

## सूर्यवंशी कुटुंबाच्या धाडसामुळे न्याय देता आला : अॅड. आंबेडकर

**पुणे । प्रतिनिधी**

वंचित उपेक्षित समाजावर, वर्गावर पोलिसांचा अत्याचार मोठ्या प्रमाणात वाढत आहे .खूप मोठ्या प्रमाणावर दबाव असूनही शहीद सोमनाथ सूर्यवंशी कुटुंबीय,त्यांची आई कोणत्याही दबावाला बळी पडली नाही त्यामुळे न्याय देता आला असे मत प्रकाश आंबेडकर यांनी व्यक्त केले.



कस्टडीत मरण पावलेल्या लोकांना न्याय मिळत नाही महाराष्ट्रात अशा फार घटना घडल्या आहेत परंतु त्यांना न्याय मिळत नाही. ज्या हिमतीने सोमनाथचे कुटुंब दबावाला बळी पडले नाही त्यामुळे कायद्यातील त्रुटी भरून काढता आली व न्याय देता आला .असे मत वंचित बहुजन आघाडीचे नेते अॅड. प्रकाश आंबेडकर यांनी व्यक्त केले.

सूर्यवंशीच्या निमित्ताने जे आतापर्यंत १८०० कस्टडीत मरण पावले त्यांना न्याय मिळण्याचे सोपे झाले आहे. आता देशभरात कस्टडीत मरण पावणाऱ्या लोकांची संख्या कमी होईल. महाराष्ट्र राज्य वडार समाजाच्या वतीने आज पुण्यात वंचित आघाडीचे नेते अॅड.प्रकाश आंबेडकर यांचा भव्य नागरी सत्कार आयोजीत करण्यात आला होता त्यावेळी आंबेडकर बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष व आयोजक वडार समाजाचे नेते अनिल जाधव आपल्या मनोगतात म्हणाले की ,वडार समजावर वर्षानुवर्षे अन्याय होत आहे त्यांना न्याय देणारे कोणी नव्हते ,आज इतक्या वर्षात वडार समाजाला न्याय मिळाला नाही पण आज अॅड.प्रकाश आंबेडकर यांनी शहीद सोमनाथ सूर्यवंशीला न्याय मिळवून दिला.वडार समाज हा अतिशय वंचित असून शासनाच्या व इतर समाजाच्या विकासापासून अतिशय दूर आहे .परंतु आता या समाजाला प्रकाश आंबेडकर यांच्या रूपाने अतिशय महत्त्वाचे नेतृत्व मिळाले आहे. वडार समाजासाठी व शहीद सोमनाथ सूर्यवंशी यांना न्याय मिळवून देण्यासाठी आंबेडकर यांनी स्वत्त लक्ष घालून न्याय मिळवून दिला हे अतिशय महत्वाचे कार्य असून त्यासाठी वडार समाजाच्या वतीने आज त्यांचा भव्य नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी कार्यक्रमास आलेल्या मान्यवरांचे स्वागत आयोजक अनिल जाधव यांनी केले.

## सकाळी ७ वाजता आयुक्त शेखर सिंह यांनी केली विसर्जन घाटांची पाहणी...

**पुणे । प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी आज सकाळी मोशी खाणसह शहरातील प्रमुख गणेश विसर्जन घाटांची पाहणी केली. विसर्जनाच्या दिवशी भाविकांची गैरसोय होऊ नये, यासाठी विसर्जन घाटांवर आवश्यक सोयीसुविधांसह पुरेशी सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात यावी, असे निर्देशही आयुक्त सिंह यांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.





या पाहणी दौऱ्यावेळी महापालिकेचे शहर अभियंता मकरंद निकम, सहआयुक्त मनोज लोणकर, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, सहशहर अभियंता देवन्ना गट्टुवार, उपायुक्त अण्णा बोदडे, सचिन पवार, सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे, अजिंक्य येळे, क्षेत्रीय अधिकारी किशोर ननावरे, मुख्य उद्यान अधीक्षक महेश गारगोटे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे,मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, विशेष अधिकारी किरण गायकवाड, उद्यान अधिक्षक योगेश वाळुंज, कार्यकारी अभियंता हरविंदसिंह बन्सल, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह महापालिकेच्या विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

आयुक्त शेखर सिंह यांच्या पाहणी दौऱ्याला मोशी खाण येथून सुरुवात झाली. यावेळी आयुक्त सिंह म्हणाले, 'मोशी खाणीकडे येणाऱ्या रस्त्यावर मुरूम टाकून त्याची डागडूजी करावी. याठिकाणी महापालिकेच्या आठही प्रभागांतून येणाऱ्या गणेश उत्सव मूर्तींच्या विसर्जनासाठी पुरेसे कर्मचारी नियुक्त करण्यात यावेत. आरोग्य विभाग व सुरक्षा रक्षकांची पथके येथे कार्यरत ठेवावीत. आवश्यक तेथे सीसीटीव्हीसह लाईट, मंडप, पिण्याचे पाणी आदी व्यवस्था करण्यात यावी,' असेही आयुक्त सिंह यांनी सांगितले.

मोशी खाणीनंतर आयुक्त सिंह यांनी मोशी येथील इंद्रायणी नदी विसर्जन घाट, पिंपरी येथील पवना नदीवरील झुलेलाल घाट, सांगवी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घाट अशा प्रमुख घाटांची पाहणी केली. यावेळी आयुक्त शेखर सिंह म्हणाले, 'विसर्जन घाटांवर गर्दीचे नियंत्रण करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करा. विसर्जन घाटांवर पुरेसे कर्मचारी व यंत्रणा कार्यान्वित ठेवा. निर्माल्यकुंडाची व्यवस्था करा. कृत्रिम विसर्जन हौदांच्या स्वच्छतेला प्राधान्य द्या. घाटांवर सुशोभीकरण करा. दिशादर्शक फलक लावा. जीवनरक्षक, अग्निशमन विभागाचे जवान व आपदा मित्र यांची नियुक्ती करा. आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा कार्यान्वित ठेवा. आवश्यक तेथे सीसीटीव्ही लावा. विसर्जन घाटाकडे येणाऱ्या रस्त्यांची डागडूजी करा,' असे निर्देश देखील आयुक्त सिंह यांनी संबंधित विभागप्रमुख, क्षेत्रीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिले.

**पीओपी व शाडू मूर्तींची नोंद ठेवा...**

आयुक्त शेखर सिंह यांनी गणेश विसर्जन घाटांवर विसर्जन केल्या जाणाऱ्या उत्सव मूर्तींची नोंद ठेवण्याचे निर्देशही संबंधित विभागांना दिले आहेत. विसर्जनासाठी आलेल्या मूर्तींची नोंद ठेवताना ती पीओपीची आहे की शाडू मातीची आहे, मूर्तीची उंची पाच फूट किंवा त्यापेक्षा जास्त आहे का, याप्रमाणे तिची नोंद करून ठेवावी, असे आयुक्त सिंह म्हणाले.

## महत्वाचे...

### आळंदीत तरुणाकडून देशी पिस्तूल व जिवंत काडतुसे जप्त

**पुणे । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड गुन्हे शाखेच्या पथकाने आळंदी मरकळ रोडवरील राज स्टीलसमोर कारवाई करून २२ वर्षीय तरुणाला अवैधरित्या देशी बनावटीचे पिस्तूल व दोन जिवंत काडतुसे बाळगल्याप्रकरणी अटक केली. आरोपी विकेश अर्जुन माळी (रा. जामनेर, जळगाव) याच्याकडून तब्बल ५२ हजार रुपये किमतीचे पिस्तूल व काडतुसे जप्त केली. त्याच्याविरोधात शस्त्र कायदा व महाराष्ट्र पोलीस अधिनियमानुसार गुन्हा दाखल केला आहे

### चाकण सिग्नलवर कंटेनरच्या धडकेत तरुण जखमी

**पुणे । प्रतिनिधी**

आंबेठाण चौकातून भोसरीकडे निघालेल्या दुचाकीस्वाराला आज सकाळी साडेसातच्या सुमारास एका कंटेनर वाहनाने धडक दिल्याने तो गंभीर जखमी झाला. आंबेठाण चौकाजवळील चाकण सिग्नलवर ही दुर्घटना घडली. कंटेनरच्या मागील डाव्या बाजूच्या चाकाखाली आल्याने दुचाकीस्वाराच्या डाव्या पायाला, गुडघ्याला, कमरेला व पोटाला गंभीर दुखापत झाली. त्याच्या दुचाकीला (एमएच १७ बीटी १९५८ होंडा शाइन) मोठे नुकसान झाले आहे. अपघातानंतर कंटेनर चालक वाहनासह पसार झाला. अपघाताची नोंद चाकण पोलिस ठाण्यात केली आहे.

### नेरे येथे कार- दुचाकी अपघात; तरुण जखमी

**पुणे । प्रतिनिधी**

मुळशी तालुक्यातील दत्तवाडी, नेरे येथील इमाले मॉल सार्वजनिक रस्त्यावर रविवारी रात्री अपघात झाला. सुझुकी एर्टिगा (एमएच १२ एनपी १००२) ही कार चालकाने बेदरकारपणे चालवून समोरून येणाऱ्या दुचाकी (एफझेड एक्स एमएच १४ केएक्स ४२२४) ला धडक दिली. या धडकेत दुचाकीस्वार जखमी झाला असून दुचाकीचे मोठे नुकसान झाले आहे.

### भरधाव कारच्या धडकेत रिक्षाचालक ठार

**पुणे । प्रतिनिधी**

महाळुंगे एमआयडीसी परिसरातील महिंद्रा सी.आय. कंपनी, बसुली फाटा येथे सोमवारी दुपारी भीषण अपघात झाला. शेवरलेट कार (क्र. एम.एच. १४ एफएक्स ४६०८) भरधाव वेगाने चालविताना रिक्षाला (क्र. एम.एच. १४ केयू ५३१०) मागून जोरदार धडक दिल्याने रिक्षाचालक शौकत मेला शेख (वय ४९, रा. संभाजी हाऊसिंग चाळ, खंडोबा माळ, भोसरी) यांचा जागीच मृत्यू झाला. धडकेत रिक्षाचालकाला बरगडी व मांडीस गंभीर दुखापत झाली.

### भोसरीत व्यापाऱ्याला ८० लाखांची आर्थिक फसवणूक

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे –नाशिक रस्त्यावरील स्वराज फर्निचरजवळील भागात दोन आरोपींनी संगनमत करून व्यावसायिकाला तब्बल ८० लाख रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. विनोद वसंत चव्हाण (वय ४१) व मनोज बसंत चव्हाण (वय ३९, दोघे रा. फॉर्च्यून अपार्टमेंट, स्पाइनसिटी रोड, भोसरी एमआयडीसी) अशी आरोपींची नावे असून त्यांनी सोमेश्वर भेळ व सागर दुजर कोन हटिन या व्यवसायामध्ये गुंतवणूक करण्यास भाग पाडले. व्यवसायातील उत्पन्न कराराप्रमाणे जमा न करता आरोपींनी संगनमत करून ती रक्कम स्वतःच्या बँक खात्यात वर्ग केली. त्यानंतर व्यवसाय तोट्यात दाखवून बंद करून, साहित्य व फर्निचरही परस्पर विकण्यात आले.

# गणपती प्रतिष्ठापना व खरेदीनिमित्त वाहतूक मार्गात बदल



**पुणे । प्रतिनिधी**

श्री गणेशाची प्रतिष्ठापना निमित्त गणेश भक्त व मंडळे सकाळी ६.०० ते २४.०० वा. पर्यंत श्रीची मुर्ती खरेदी करीतअसतात. गणेश मुर्ती विक्रीचे बहुसंख्य स्टॉल हे डेंगळे पुल ते शिवाजी पुलाचे दरम्यान श्रमिक भवन समोर (आण्णाभाऊ साठे चौक) कसबापेठ पोलीस चौकी ते जिजामाता चौक ते मंडई, सावरकर पुतळा ते समाधान भेळ सेंटर (सिंहगड रोड) तसेच कुंभारवाडा, केशवनगर मुंढवा येथे आहेत. या परीसरातील नागरीकांची गैरसोय तसेच वाहतुकीची कोंडी टाळणेसाठी या ठिकाणी वाहतुक सुरक्षीत व सुरळीतपणे राहणे गरजेचे असल्याने पोलीस उप आयुक्त, वाहतुक शाखा पुणे शहर हिंमत जाधव यांनी अत्यावश्यक सेवेतील वाहने यामध्ये फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहिका वगळून आवश्यकते नुसार २५ ते २७ ऑगस्ट दरम्याण सकाळी ६.०० ते रात्री २४.०० पर्यंत आवश्यकतेनुसार वाहतुक बदलाबाबतचे पुढीलप्रमाणे आदेश जारी केले आहेत.

शिवाजी रोड :- गाडगीळ पुतळा चौक ते गोटीराम भैय्या चौक वाहतूकीसाठी बंद करण्यात येत आहे. वाहन बालकांनी खालील मार्गाचा अवलंब करावा. पर्यायी मार्ग :- गाडगीळ पुतळा चौकातून डावीकडे वळण घेऊन संताजी घोरपडे पथावरुन कुंभारवेस चौक, शाहीर अमर शेख चौक मार्गे इच्छितस्थळी जावे. शिवाजीनगर कडून शिवाजी रोडने स्वारगेटकडे जाणाऱ्या वाहनचालकांनी स.गो. बर्वे चौकातून डावीकडे वळन न घेता, सरळ जंगली महाराज रोडने खंडोजीबाबा चौक, टिळक चौक मार्गे इच्छितस्थळी जावे. झाशी राणी चौक ते खुडे चौक ते डेंगळेपुल मार्गे कुंभारवेसकडे जाणा-या वाहन चालकांनी खुडे चौकामधून म.न.पा.पुणे समोरुन मंगला सिनेमा लेन मधुन कुंभारवेस किंवा प्रिमीयर गॅरेज चौक शिवाजीपुल मार्गे गाडगीळ पुतळा चौक डावीकडे वळन घेऊन कुंभारवेस चौक या मार्गाचा वापर करावा.

सावरकर पुतळा चौक ते समाधान भेळ सेंटर (सिंहगड रोड) नो पार्कींग, गणपती विक्री दरम्यान रस्त्याचे दोन्ही बाजूकडील वाहतूक सुरु राहील, परंतू नमुद टप्प्यामध्ये कोणत्याही प्रकारची वाहने पार्क करु नये. पार्किंग व्यवस्था:- मित्रमंडळ चौक ते पाटील प्लाझा पर्यंत, जमनालाल बजाज पुतळा ते पुरम चौक रस्त्याचे डाव्या बाजूस, निलायम ब्रिज ते सिंहगड रोड जंक्शन. केशवनगर, मुंढवा येथे २७ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ६.०० ते २४.०० वाजेपर्यत तात्पुरत्या स्वरुपात आवश्यकतेप्रमाणे वाहतुकीमध्ये पुढील प्रमाणे बदल करण्यात येत आहे.

एकेरी मार्ग :- छत्रपती शिवाजी महाराज चौक, केशवनगर येथून मांजरीकडे नगर संथत मंजरीकडे जाणाऱ्या वाहनचालकांनी मांजरी रोडने न जाता गायरान वस्ती रोडने रेणुका माता मंदीर येथुन उजवीकडे वळून विहान सोसा रोडने मांजरी रोडकडे जावे. गायरान वस्ती येथून मुंढवा चौकाकडे येणाऱ्या वाहनचालकांनी रेणुका माता मंदिर येथून डावीकडे वळून पुढे व्यंकटेश ग्राफिक्स येथून उजवीकडे वळून मांजरी रोडवरून मुंढवा चौकाकडे जावे. पुढे दिलेल्या मार्गावरुन सर्व प्रकारच्या वाहनांकरीता (जड वाहनांना प्रवेश बंदी) एकेरी वाहतूक सुरु राहील. फडके हौद चौक ते जिजामाता चौक ते फुटका बुरुज, आप्पा बळवंत चौक ते बुधवार चौक ते मोती चौक, मंगला टॉकिज समोरील प्रिमीयर गॅरेज लेन मधूनकुंभारवेस. गणेश मुर्ती खरेदीसाठी येणारे भक्त व गणपती मंडळाची वाहने न्या. रानडे पथावर कामगार पुतळा चौक ते शिवाजी पुतळा या दरम्यान रस्त्याचे कोर्टाकडील एका बाजूस, वीर संताजी घोरपडे पथावर म.न.पा. बिलभरणा केंद्र ते गाडगीळ पुतळा चौक या रस्त्याचे दक्षिण बाजूस, टिळक पुल ते भिडे पुल दरम्यानचे नदीपात्रातील रस्त्यावर, मंडई येथील मिनर्व्ह व आर्यन पार्किंग तळावर, शाहू चौक (फडगेट चौकी चौक) ते राष्ट्रभुषण चौक फक्त रस्त्याचे डावे बाजुस पार्कींग करावी.

शिवाजीनगर स्टॅण्डवरुन शिवाजीरोडने स्वारगेटकडे जाणाऱ्या बसेस स.गो. बर्वे चौकातून शिवाजीपुलावरुन जाण्याऐवजी स.गो. बर्वे चौकामधून जंगली महाराज रोडने टिळक चौक मार्गे टिळक रोडने स्वारगेटकडे जातील. कार्पोरेशन बसस्टॉप येथून स्वारगेटकडे जाणाऱ्या बसेस ह्या झाशीराणी चौक मार्गे जंगली महाराजरोडने अलका टॉकीज चौक, टिळक रोड / शास्त्री रोडने स्वारगेटकडे जातील. तरी वाहनचालकांनी वरील प्रमाणे करण्यात आलेल्या वाहतुक बदलांचा अवलंब करून वाहतुक सुरळीत ठेवण्यास वाहतुक पोलीसांना सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस उप आयुक्त, वाहतुक शाखा पुणे शहर हिंमत जाधव यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये केले आहे.





# गणेशोत्सवानिमित्त ३ आरोपींवर तडीपारची कारवाई

**पुणे । प्रतिनिधी**

आंबेगाव पोलीस स्टेशनचे रेकॉर्डवरील शरिराविरुध्द गुन्हे करणारे सराईत आरोपी नामे १) अभय उर्फ सोन्या अशोक निसर्गंध वय २० वर्षे, रा. जांभुळवाडी रोड, सिद्धी विनायक कॉलनी, सप्तगिरी सोसायटी, वाघजाई मंदिराजवळ, आंबेगाव खुर्द, पुणे २) विनोद दिलीप धरतीमगर वय २२ वर्षे, रा. भैरवनाथ मंदिराजवळ, आंबेगाव बु. पुणे ३) प्रथमेश उर्फ अभय देविदास कुडले वय २१ वर्षे रा. मातृछाया निवास, गणराज कॉलनी, दत्तनगर आंबेगाव बुगा पुणे यांचेवर भारती विद्यापीठ व आंबेगाव पोलीस स्टेशन येथे शरीराविरुध्द तसेच मालमत्तेविरूद्धचे गुन्हे दाखल असुन त्यांचेवर वारंवार प्रतिबंधक कारवाई करुन देखिल त्यांनी पुन्हा पुन्हा गुन्हे केले आहेत. त्यांची आंबेगाव खुर्द, आंबेगाव बु.।।, जांभुळवाडी रोड परिसरात दहशत असुन ते लोकांना दमदाटी करणे, लुटमार करणे तसेच मारामारी, तोडफोड, दगडफेक, दहशत पसरविणे असे प्रकारचे गुन्हे करीत होते.

त्यांचेवर आंबेगाव पोलीस स्टेशनकडील तपास पथकाचे अधिकारी पोलीस उप निरीक्षक युवराज शिंदे, पोलीस अंमलदार चंद्रकांत माने, निलेश ढमढेरे, अजय सावंत व सोनाली शिंदे यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शरद झिने यांचे मार्गदर्शनाखाली सदर आरोपीं विरुध्द पुरावे गोळा करुन मु.पो. ॲक्ट कलम ५६ प्रमाणे प्रस्ताव मा. पोलीस उप-आयुक्त परिमंडळ २ पुणे शहर श्री. मिलिंद मोहिते यांचे कार्यालयात सादर केला असता मा. पोलीस उप-आयुक्त परिमंडळ २, पुणे शहर यांनी अ.क्र. ०१ व ०२ यांना अनुक्रमाने तडीपार आदेश क्रमांक ०४/२०२५ व ०९/२०२५ प्रमाणे दि. १९/०८/२०२५ पासुन ०२ वर्षांकरीता पुणे शहर, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय परिक्षेत्र व पुणे जिल्हयातुन तडीपार केले असुन त्यांना दि. २४/०८/२०२५ रोजी अ.क्र. १ यास सातारा व अ.क्र. ०२ यास म्हसवड येथे सोडण्यात आले. तसेच अ.क्र. ०३ यास तडीपार आदेश क्र. १२/२०२५ दि. २५/०८/२०२५ प्रमाणे ०२ वर्षांकरीता पुणे शहर, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय परिक्षेत्र व पुणे जिल्हयातुन तडीपार केले असुन त्यास दि.२६/०८/२०२५ रोजी शिरवळ जि. सातारा येथे सोडले आहे.

# वाघोलीतील चैन स्नॅचींग प्रकरणाचा ४८ तासांत पर्दाफाश; मुद्देमालासह आरोपी जेरबंद

**पुणे । प्रतिनिधी**

दिनांक २१ ऑगस्ट रोजी वाघोली येथील केसनंद रोडवर पायी जात असलेल्या महिलेचे गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र दोन अज्ञात इसमांनी मोटारसायकलवरून हिसकावून नेले होते. या गंभीर गुन्ह्याचा तपास अवघ्या ४८ तासांत उकलून गुन्हे शाखा युनिट ६ च्या पथकाने आरोपीस मुद्देमालासह जेरबंद केले आहे.



पोलीस निरीक्षक वाहीद पठाण यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट ६ कडील पथकाने घटनास्थळ व परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींचे फोटो मिळवले. युनिट ६ चे अंमलदार नितीन मुंढे यांनी आरोपींची ओळख पटवून तांत्रिक तपास सुरु केला. सुरुवातीला आरोपी बीड येथे असल्याचे समजल्याने पथक तिकडे रवाना झाले. परंतु पुढील माहितीच्या आधारे गणेशनगर, तळवडे, निगडी, पुणे येथे सापळा रचून विधीसंघर्षित बालकास त्याच्या पालकांच्या उपस्थितीत ताब्यात घेण्यात आले.

सदर गुन्ह्यात वापरलेली बजाज कंपनीची पल्सर मोटारसायकल (किंमत रु. ५०,०००/) तसेच चोरीस गेलेले सोन्याचे मंगळसूत्र (किंमत रु. १,००,०००/-) असा एकूण रु. १,५०,०००/- किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. आरोपीविरुद्ध पूर्वी बीड व संभाजीनगर पोलीस ठाण्यात घरफोडी, मारहाण, शस्त्रास्त्र कायदा आदी गंभीर कलमान्वये अनेक गुन्हे नोंद असल्याचे उघड झाले आहे.

ही कारवाई मा. अप्पर पोलीस आयुक्त (गुन्हे) पंकज देशमुख, मा. पोलीस उपआयुक्त (गुन्हे) निखिल पिंगळे, मा. सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) राजेंद्र मुळीक तसेच पोलीस निरीक्षक वाहीद पठाण यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या यशस्वी कामगिरीत सपोनि राकेश कदम, सपोनि मदन कांबळे, पोलीस अंमलदार सारंग दळे, बाळासाहेब सकटे, प्रशांत कापुरे, निलेश साळवे, नितीन मुंढे, कानिफनाथ कारखेले, गिरीष नाणेकर, सुहास तांबेकर, सचिन पवार, निर्णय लांडे, नेहा तापकीर, ऋषीकेश ताकवणे, नितीन धाडगे, ऋषीकेश व्यवहारे, शेखर काटे, बाळासाहेब तनपुरे, प्रतिक्षा पानसरे, कीर्ती मांदळे व सोनाली नरवडे यांनी सहभाग नोंदविला. पुढील तपास गुन्हे शाखा युनिट ६ कडून सुरू आहे.

# अनुसूचित जाती, जमातींच्या लाभार्थ्यांसाठी दुधाळ जनावरांचे गट वाटप योजना

**पुणे । प्रतिनिधी**

पशुसंवर्धन विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या अनुसूचित जाती-जमातींच्या लाभार्थ्यांना संकरीत, देशी गायी व दुधाळ म्हशींचे गट वाटप योजनेंतर्गत सन २०२४-२०२५ मध्ये ४ हजार ७१४ लाभार्थ्यांना ६३ कोटी ३८ लाख रुपये अनुदान वितरीत करण्यात आले आहे.

राज्याच्या दूध उत्पादनामध्ये वाढ करण्याबरोबरच ग्रामीण भागातील शेतकरी व पशुपालकांना अर्थाजनाचे व स्वयंरोजगाराचे साधन उपलब्ध करुन देण्यासाठी ही योजना राबविण्यात येते. या योजनेंतर्गत २०२४-२०२५ मध्ये अनुसूचित जाती प्रवर्गासाठी ३ हजार ८१० लाभार्थ्यांना ५१ कोटी २२ लाख रुपये तर अनुसूचित जमाती प्रवर्गातील



९०४ लाभार्थ्यांना १२ कोटी १६ लाख निधी वितरीत करण्यात आला आहे.

या योजनेंतर्गत ७५ टक्के अनुदानावर २ दुधाळ संकरीत, देशी गार्यीचा किंवा म्हशींचा गट तीन वर्षाच्या

विम्यासह देण्यात येतो. गायीची प्रकल्प किंमत १ लाख ५६ हजार ८५० रुपये आहे. त्यामध्ये पशुधनाची किंमत १ लाख ४० हजार व १६ हजार ८५० रुपये विम्याची रक्कम आहे. तर म्हशीची प्रकल्प किंमत १ लाख ७९ हजार २५८ रुपये असून त्यापैकी पशुधनाची किंमत १ लाख ६० हजार असून विम्याची रक्कम १९ हजार २५८ रुपये आहे. पशुधनाच्या प्रकल्प किंमतीमध्ये २५ टक्के हिस्सा लाभार्थ्यांने भरावयाचा असून ७५ टक्के अनुदान शासनामार्फत देण्यात येते.

लाभार्थी निवडीचे निकष व आवश्यक कागदपत्रे : लाभार्थी दारिद्र्य रेषेखालील, अत्यल्प, अल्प भूधारक, सुशिक्षित बेरोजगार, महिला बचत गटातील असावा. तसेच एकूण लाभार्थ्यांमध्ये ३ टक्के दिव्यांग व ३० टक्के महिला लाभार्थी असतील. अर्जासोबत छायाचित्र ओळखपत्राची सत्यप्रत, दारिद्र्य रेषेखाली असल्याचा दाखला, ७/१२ व ८ अ उतारा आणि ग्रामपंचायत नमुना नं. ८, प्रशिक्षण घेतले असल्यास प्रमाणपत्राची छायांकित सत्यप्रत, जातीच्या दाखल्याची सत्यप्रत, बचत गट सदस्य असल्यास प्रमाणपत्र, रोजगार स्वयंरोजगार कार्यालयाची नाव नोंदणी कार्डाची सत्यप्रत, अपत्य दाखला आदी कागदपत्र जोडणे आवश्यक राहील.

ही योजना जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद यांचेमार्फत राबविण्यात येत असून लाभार्थी निवड अक-चअकअइचड या ऑनलाईन संगणक प्रणालीद्वारे करण्यात येते. अधिक माहितीसाठी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा.

# पुण्यात बनावट शेअर ट्रेडिंग ॲपमधून ६३ लाखांची फसवणूक

**पुणे । प्रतिनिधी**

लाईफ रिपब्लिक, कासारसाई परिसरात राहणाऱ्या एका नोकरी करणाऱ्या व्यक्तीची तब्बल ६३.९३ लाखांची ऑनलाइन फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. बनावट IFL Capital या शेअर ट्रेडिंग माध्यमातून संशयितांनी पीडित व्यक्तीकडून गुंतवणूक करून घेतली.

गुंतवलेल्या रकमेवर तब्बल ५६.९१ लाखांचा नफा झाल्याचे आमिष दाखवत, तो नफा व मूळ रक्कम परत देण्यासाठी २० टक्के कमिशनची मागणी करण्यात आली. मात्र त्यानंतर ना नफा, ना मूळ गुंतवणूक परत देण्यात आली.

सायबर गुन्हे शाखेत दाखल तक्रारीनुसार, या फसवणुकीत संशयितांनी मोबाईल क्रमांकांचा वापर करून विश्वास संपादन केला. या प्रकरणी माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० अंतर्गत कलम ६६(सी), ६६(डी) सह फसवणुकीचे गुन्हे दाखल करण्यात आले असून, पुढील तपास अंमलदार पांनि नाळे हे करतआहेत.

# चित्रकलेत रमले वडगावशेरी मतदारसंघाचे नागरिक; एसपीएफ आर्ट सर्कल तर्फे चित्रांगण चित्रकला स्पर्धेचे आयोजन

**पुणे । प्रतिनिधी**

कला म्हणजे छंदाचा पलीकडे जाऊन जगण्याला अर्थ देणारी प्रेरणा असते. सुप्रसिद्ध लेखक पु. ल. देशपांडे यांनी म्हटले आहे, पोटापाण्याचा उद्योग तुम्हाला जगवील, पण कलेशी जमलेली मैत्री तुम्ही का जगायचं हे सांगून जाईल. याच विचाराला उजाळा देत सुरेंद्र पठारे फाउंडेशन आर्ट सर्कलच्या वतीने आयोजित 'चित्रांगण' या चित्रकला स्पर्धेचे शनिवारी (ता. २३ ऑगस्ट) रोजी पठारे इनडोअर स्टेडियम, खराडी येथे संपन्न झाली. स्पर्धेचे उद्घाटन सुरेंद्र पठारे फाऊंडेशनचे अध्यक्ष











सुरेंद्र पठारे तसेच ऐश्वर्या पठारे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यात लहान मुलांपासून ते प्रौढांपर्यंत जवळपास १४१५ जण प्रत्यक्षरित्या सहभागी झाले.

एकूणच वडगावशेरी मतदारसंघातील नागरिकांसाठी ही स्पर्धा विनामूल्य भरवण्यात आली. यात स्पर्धेचे पाच गट करण्यात आले होते. गट अ (४ ते ६ वर्षे) यांना 'माझे आनंदी कुटुंब', गट ब (७ ते १० वर्षे) यांना 'कोणताही एखादा सण', गट क (११ ते १४ वर्षे) यांना 'स्वप्नातले शहर', गट ड (१५ ते १८ वर्षे) यांना 'विविधतेत एकता', तर गट इ (१८ पेक्षा जास्त) यांना 'माझ्या दृष्टिकोनातले जग' हा विषय देण्यात आला होता.

तेलरंग, पोस्टर कलर्स, क्रेयॉन्स, वॉटर कलर्स, स्केचिंग पेन्सिल्स अशा विविध रंगसाहित्याच्या साहाय्याने मुलांनी व प्रौढांनी रेखाटलेली चित्रे पाहण्यासारखी होती. प्रत्येकाने चित्रांतून एक वेगळे जग निर्माण केले होते. प्रत्येक चित्रात कलात्मकतेसोबत कल्पकतेची छाप उमटत होती.

स्पर्धेविषयी बोलताना सुरेंद्र पठारे फाऊंडेशनचे अध्यक्ष सुरेंद्र पठारे म्हणाले, कला ही समाजाला संवेदनशील बनवते. मुलांमध्ये कल्पनाशक्ती, कलेविषयी आवड व तरुणांमध्ये तसेच प्रौढांमध्ये कला जिवंत ठेवण्यासाठी अशा उपक्रमांची गरज आहे. भविष्यात संगीत, नृत्य, नाट्य यांसह विविध कला प्रकारांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध स्पर्धा राबवणार आहोत. या चित्रकला स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्वांचे आभार आहे.

स्पर्धेसाठी लहान मुले, पालक, नागरिक, कलाप्रेमी रसिकांची मोठी मांदियाळी जमली होती. 'चित्रांगण'मुळे चित्रांचा उत्सव घडून आला, अशी भावना सहभागी स्पर्धकांनी व उपस्थितांनी व्यक्त केली.